// // नियमित दिवाणी दावा क्र. ४९४/२०२५
जुना नियमित दिवाणी दावा क्र. ५३६/२०१६
वनमाला जाधव (कोळी) व ईतर वि.
रामदास कोर्टेकर (कोळी) व ईतर

## आदेश निशाणी क्र. ४९
(दिनांक ०९ जून २०२६ रोजी पारीत)

०१. वादींनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांच्या पुराव्याची बाजू बंद करणारा आदेश रद्दबातल ठरवून सदर अर्जासोबत दिलेल्या साक्षीदाराचा पुरावा स्वीकारण्यात यावा, अशी मागणी केलेली आहे.

०२. वादींनुसार, त्यांनी ज्वारीच्या पिकाच्या कामामध्ये व्यस्त असल्यामुळे न्यायालयात साक्षीदारासह हजर होवून त्यांचा पुरावा सादर करू शकले नव्हते; परंतु त्यांनी सदर अर्जासोबत त्यांच्या साक्षीदाराचे सर तपासणीचे प्रतिज्ञापत्र दिलेले असून त्याला तपासण्यासाठी त्यांच्या पुराव्याची बाजू बंद करणारा आदेश रद्दबातल ठरवून पुरावा सादर करण्यास परवानगी द्यावी, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र. ३ च्या वतीने सदरच्या अर्जाला तो खोटा व काल्पनिक असल्याचा आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्यानुसार, दिनांक १२/०६/२०२४ रोजी वादींच्या पुराव्याची बाजू बंद करणारा आदेश पारीत करण्यात आलेला होता. तो वादीच्या निशाणी क्र. ४२ वरील अर्जानुसार रुपये २,०००/— परीव्यय लादून मंजूर करण्यात आला; परंतु वादीं परत न्यायालयात हजर राहिलेले नाहीत म्हणून दिनांक १७/०२/२०२६ रोजी त्यांच्या पुराव्याची बाजू बंद करण्यात आलेली आहे. त्यांच्यानुसार, गेल्या दोन वर्षापासून वादीं न्यायालयात हजर नाहीत, तेव्हा त्यांचा अर्ज नामंजूर करावा किंवा अर्ज मंजूर केला तर वादींवर मोठा परीव्यय लादावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०४. वादींसाठी वकील श्री. बी. एस. पोळ यांना ऐकले तर प्रतिवादी क्र. ३ च्या वकिलाची सकाळी ११:०० वाजल्यापासून ते सायंकाळी ०५:०५ पर्यंत वाट पाहिली; परंतू त्यांनी हजर झाले नाहीत म्हणून त्यांना ऐकता आलेले नाही.

०५. श्री. पोळ यांनी निवेदन केले की, जरी वादी यांना त्यांच्या साक्षीदाराचा पुरावा सादर करण्यात विलंब झालेला असला तरी तो जाणीवपूर्वक केलेला नाही. त्यांच्यानुसार, वादी हे आडाणी आणि ग्रामस्थ आहेत. त्यांना शेतीकामातून वेळ काढणे सहज सुलभ होत नाही, शिवाय यापूर्वी त्यांनी मोठा परीव्यय भरलेला आहे. तेव्हा त्यांनी वादीला या अर्जासोबत दाखल केलेला साक्षीदाराचा पुरावा सादर करण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचे अपरिमित नुकसान होवू शकते. ही बाब जरी मान्य केली की, प्रतिवादी क्र. ३ च्या वतीने मोठा आक्षेप आलेला आहे; परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीच्या साक्षीदार क्र. १ ची उलट तपासणी त्यांच्याकडून अद्यापपर्यंत घेण्यात आलेली नाही, जेव्हा ती अभिलेखाप्रमाणे वादी अनेकवेळा न्यायालयात हजर झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये असे म्हणता येणार नाही की, सदर प्रतिवादी हा सद्हेतुक आक्षेप घेत आहे. तेव्हा हे मान्य करूनही की, वादीने सदरचा अर्ज आणि त्यांच्या साक्षीदाराला न्यायालयासमक्ष हजर करण्यात अक्षम्य दिरंगाई दर्शविलेली आहे; परंतु दावा प्रलंबित असताना वादीला एक संधी देणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांना पुरेसा पुरावा देण्याची संधी मिळेल. ही देखील बाब सुस्पष्ट की, प्रतिवादी क्र. ३ ला अधिक काळासाठी वाट पाहावी लागणार आहे म्हणून त्याला भरपाई देणे आवश्यक आहे म्हणून अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

// //  नियमित दिवाणी दावा क्र. ४९४/२०२५
जुना नियमित दिवाणी दावा क्र. ५३६/२०१६
वनमाला जाधव (कोळी) व ईतर वि.
रामदास कोर्टेकर (कोळी) व ईतर

**आदेश**

१.अर्ज परीव्यय रक्कम रुपये ५००/— लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत परीव्यय रक्कम प्रतिवांदीना भरपाई म्हणून हस्ते दिल्यावरून किंवा देण्यासाठी न्यायालयात जमा केल्यावरून त्यांना केवळ प्रतिज्ञापत्र दिलेल्या साक्षीदाराचा पुरावा सादर करण्यास्तव परवानगी देण्यात येईल;

३. वादीं उपरोक्त परीपुर्ततेसह त्यांच्या दोन्ही साक्षीदारांसह पुढील तारखेवर उलट तपासणीसाठी न्यायालयासमक्ष हजर राहतील;

४. परीव्यय हा वादीं/अर्जदारांवर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.06.09 18:01:45 +0530

दिनांकः ०९.०६.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade-II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division<br>Bhoom, Tq. Bhoom<br>Dist. Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 09.06.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 09.06.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 09.06.2026 |